# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १२७ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०७ आषाढ शके १९४८, रविवार दि.२८ जून २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शिक्षणाचा बाजार: ब्रँडेड प्री-स्कूल की कोवळ्या जीवांचा खेळ?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्याच्या युगात, विशेषतः शहरी आणि निम-शहरी भागात, पूर्व-प्राथमिक शिक्षणाचे व्यावसायिकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. ब्रँडेड शाळांच्या झगमगाटात लहान मुलांचे बालपण हरवून जात आहे का, हा खरा प्रश्न आहेशिक्षणाच्या बाजारीकरणात ब्रँडेड प्री-स्कूल खरोखरच मुलांचा विकास करत आहेत की त्यांच्या कोवळ्या भावनांशी खेळत आहेत, हा आजचा सर्वात मोठा प्रश्न आहे.

एक अवघ्या २३ महिन्यांचा चिमुरडा... जो अजून नीट बोलूही शकत नाही, स्वतःच्या वेदना शब्दांत मांडू शकत नाही. आई-बाबांनी अत्यंत विश्वासाने आणि आपल्या काळजाच्या तुकड्याचे भविष्य घडवण्यासाठी त्याला छत्रपती संभाजीनगरमधील 'फर्स्टक्राय इंटेलिटॉट्स प्री-स्कूल' (एन-१, सिडको) या नामांकित ब्रँडच्या शाळेत सोडले. पण तिथे जे घडले, ते ऐकून कोणत्याही संवेदनशील पालकाच्या अंगावर काटा आल्याशिवाय राहणार नाही.

वर्गात शिक्षिका नाही, मदतनीस महिला लहान मुलांना आत कोंडून बाहेरून दरवाजा लॉक करून निघून जाते... आणि पुढील २० ते ३० मिनिटे त्या बंद खोलीत जो थरार घडतो, तो विचार करूनही थरकाप उडवतो. दुसऱ्या एका मोठ्या मुलाकडून त्या २३ महिन्यांच्या निष्पाप बाळाला बेदम मारहाण केली जाते, त्याच्या शरीरावर तब्बल २० ते २५ ठिकाणी अमानुषपणे चावे घेतले जातात. वेदनेने विव्हळत रडणारे ते बाळ आणि त्या खोलीत भीतीपोटी उलट्या करणारी इतर मुले... हा केवळ शाळा प्रशासनाचा निष्काळजीपणा नाही, तर क्रूरतेची परासीमा आहे!

सोशल मीडिया आणि विविध माध्यमांतून समोर आलेली ही घटना केवळ एका कुटुंबावर आलेले संकट नाही, तर आपल्या संपूर्ण समाजव्यवस्थेसाठी आणि प्रशासनासाठी एक अत्यंत गंभीर धोक्याची घंटा आहे. नामांकित ब्रँडची मोठी नावे आणि खाजगी शाळांचा चकचकाट पाहून भुलणाऱ्या पालकांनो, आता डोळे उघडून अधिक सतर्क होण्याची वेळ आली आहे.

पैसे कमावण्याचा धंदा आणि कायदेशीर अनास्था

मिळालेल्या माहितीनुसार, देशोदेशी शेकडो शाखा असणाऱ्या या मोठ्या ब्रँड्सच्या शाळा अनेकदा स्थानिक पातळीवर कोणतीही शासकीय परवानगी न घेता, केवळ पैसे कमावण्याचा धंदा मांडून बसल्या आहेत. कोणताही प्रशिक्षित स्टाफ नसणे, सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवणे आणि बालहक्कांची पायमल्ली करणे असे धक्कादायक प्रकार या निमित्ताने समोर येत आहेत.

कोणत्याही खाजगी प्री-स्कूलला स्थानिक महानगरपालिका, शिक्षण विभाग किंवा महिला व बालविकास विभागाच्या नियमांचे पालन करणे कायदेशीररित्या बंधनकारक असते. जर या संस्थांकडे आवश्यक परवाने नसतील, तर हा थेट पालकांच्या विश्वासाशी आणि मुलांच्या जिवाशी केलेला खेळ आहे. केवळ सोशल मीडियावर संताप व्यक्त करून हा प्रश्न सुटणार नाही, तर पालकांनी संघटित होऊन स्थानिक शिक्षण अधिकारी आणि महानगरपालिकेकडे अशा शाळांविरुद्ध लेखी तक्रारी नोंदवून त्यांना टाळे ठोकण्यास भाग पाडले पाहिजे.

मुलाला शाळेत घालताना पालकांनी प्रत्येक गोष्टींची स्वतः खात्री करायला हवी.प्रवेश घेताना खालील गोष्टींचे ऑडिट स्वतः करायला हवे. आपण शाळेला मोठी फी देतो, त्यामुळे मुलांच्या सुरक्षिततेबद्दल जाब विचारण्याचा आणि प्रत्येक गोष्टीची लेखी खात्री करून घेण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. चा थेट ॲक्सेस चेक करावा. शाळेत सीसीटीव्ही असणे आता पुरेसे नाही. त्या फ ुटेजचा थेट ॲक्सेस तुमच्या मोबाईलवर मिळायलाच हवा, जेणेकरून तुम्ही ऑफिसमध्ये बसूनही तुमच्या मुलावर लक्ष ठेवू शकाल.

स्टाफ आणि मुलांचे प्रमाण तपासा. वर्गात मुलांच्या संख्येनुसार किती केअरटेकर आणि शिक्षक आहेत? लहान मुलांच्या वर्गात एका क्षणासाठीही मुले एकटी राहणार नाहीत, याची लेखी हमी प्रशासनाकडून घ्या.

पार्श्वभूमी तपासणी म्हणजेच शाळेतील शिक्षक, मदतनीस, आया किंवा सुरक्षा रक्षक या सर्वांची पोलीस पडताळणी झाली आहे का? आया किंवा केअरटेकर लहान मुलांशी वागण्याइतपत मानसिकदृष्ट्या सक्षम आणि संवेदनशील आहेत का, हे तपासा.

आपत्कालीन व्यवस्था तपासून घ्यावी. वर्गात अचानक एखादी दुर्घटना घडली, मूल आजारी पडले किंवा त्याला दुखापत झाली, तर तिथे प्रथमोपचार आणि तात्काळ डॉक्टरांची काय व्यवस्था आहे? शाळा प्रशासनाचा आपत्कालीन प्लॅन काय आहे, हे समजून घ्या.

शाळेला अनपेक्षित भेटी द्या. मूल शाळेत गेल्यानंतर कधीतरी अचानक, न सांगता शाळेत फेरफटका मारा. वर्गखोल्या कशा आहेत, मुले सुरक्षित वातावरणात आहेत का, हे प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहा. मुलाच्या वर्तनातील बदल ओळखा. लहान मुले बोलून सांगू शकत नाहीत. पण जर मूल शाळेत जाण्यास प्रचंड घाबरत असेल, सतत रडत असेल, चिडचिड करत असेल किंवा त्याच्या शरीरावर काही ओरखडे, जखमा दिसत असतील, तर त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. छत्रपती संभाजीनगरमधील या घटनेने नामांकित प्री-स्कूलसच्या अंतर्गत सुरक्षेचे धिंडवडे काढले आहेत. केवळ एखाद्या कर्मचाऱ्याला कामावरून काढून किंवा माफी मागून हे व्यवस्थापन मोकळे होऊ शकत नाही. अशा बेजबाबदार शाळांवर कडक कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे आणि पालकांनीही अशा अनधिकृत आणि निष्काळजी शाळांमधून आपल्या मुलांचे प्रवेश काढून घेऊन त्यांना योग्य धडा शिकवला पाहिजे. जोपर्यंत शिक्षण विभाग आणि शासन या प्ले-स्कूलससाठी कडक नियमावली तयार करत नाही आणि त्यांचे नियमित शासकीय ऑडिट करत नाही, तोपर्यंत आपल्या कोवळ्या कळ्या सुरक्षित राहू शकत नाहीत. आज गरज आहे ती पालकांच्या जागरूकतेची आणि प्रशासनाच्या कठोर कारवाईची! तुमची सतर्कताच तुमच्या मुलाला सुरक्षित ठेवू शकते.


# ज्ञानकोश सर्वसमावेशक व पारदर्शी ज्ञानचळवळीचे माध्यम-डॉ.अनुजा कुलकर्णी

## केतकर ज्ञानपीठ संवाद मंचात विचारमंथन; ज्ञानकोश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा - ''लोकमंगल ग्रुप'' शिक्षण संस्था व केतकर कुल महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर प्रथम मराठी साहित्य संमेलन २०२६ अंतर्गत आयोजित 'केतकर ज्ञानपीठ संवाद मंच' या विशेष परिसंवादात ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या वैचारिक, सामाजिक आणि ज्ञानप्रबोधनात्मक कार्याचा सखोल आढावा घेण्यात आला. लोकमंगल हायस्कूल, नागेवाडी-कुशी (ता. जि. सातारा) येथे गुरुवारी (दि. १८ जून) हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय केतकर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून आरती जव्हेरी, सुधाकर जोशी, दिलीप अनगळ आणि राजीव केतकर उपस्थित होते. या संवाद मंचात डॉ. अनुजा कुलकर्णी, नीलिमा नातू, मिलिंद केतकर आणि सतीश केतकर यांनी विचार मांडले. स्वागताध्यक्ष म्हणून शिरीष चिटणीस यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या आयोजनात स्वागताध्यक्ष शिरीष चिटणीस व लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस यांचे विशेष योगदान लाभले.



यावेळी बोलताना डॉ. अनुजा कुलकर्णी म्हणाल्या की, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी मराठी ज्ञानकोशाच्या माध्यमातून महाराष्ट्रात ज्ञानकोशाची व्यापक चळवळ उभी केली. प्रत्येक भाषेला स्वतःचा इतिहास, संस्कृती आणि ज्ञानपरंपरा असते, या भूमिकेतून त्यांनी प्रांतीय भाषांमध्ये ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानप्रसाराचे कार्य सुरू केले. ज्ञानकोश निर्मितीसाठी आवश्यक आर्थिक भांडवल उभारण्याच्या उद्देशाने त्यांनी कंपनीची स्थापना केली होती. ज्ञानकोश हा सर्वसमावेशक, वस्तुनिष्ठ आणि सर्वांसाठी खुला असावा, अशी त्यांची धारणा होती. ज्ञान सामान्य नागरिकांपर्यंत पारदर्शी पद्धतीने पोहोचले पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा गाभा असल्याचे त्यांनी नमूद केले.

मिलिंद केतकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, डॉ. केतकर यांनी निर्माण केलेला ज्ञानाचा हा अमूल्य ठेवा आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. मराठी ज्ञानकोशाचे विविध खंड सर्वसामान्य वाचकांना सहज उपलब्ध व्हावेत, यासाठी शासन, सामाजिक संस्था आणि अभ्यासकांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. ज्ञानकोशातील विचार आणि माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात संजय केतकर यांनी डॉ. केतकर यांच्या पत्रकारितेतील योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, लोकमान्य टिळक हयात असताना डॉ. श्रीधर केतकर यांचे लेख नियमितपणे दैनिक केसरीमध्ये प्रसिद्ध होत होते. मात्र लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर हे लेख प्रसिद्ध होणे बंद झाले. यावरून डॉ. केतकर यांच्या विचारांना त्या काळात मिळालेली प्रतिष्ठा आणि महत्त्व अधोरेखित होते.

संवाद मंचात उपस्थित वक्त्यांनी डॉ. केतकर यांचे ज्ञानकोश निर्मितीमधील योगदान, समाजप्रबोधनाची भूमिका, संशोधनवृत्ती आणि ज्ञानलोकशाहीची संकल्पना यांवर सखोल चर्चा केली. त्यांच्या कार्याचा अभ्यास नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्थेच्या सचिव शिल्पा चिटणीस, प्रभारी मुख्याध्यापक शशिकांत जमदाडे, मुख्याध्यापक विजय यादव, दत्तात्रय सावंत (पाटील), नितीनकुमार कसबे, शशिकांत जाधव, सतीश पवार, ज्ञानेश्वर मोहटकर, संदीप जाधव, बाळकृष्ण इंगळे, हणमंत खुडे, राहुल घोडके, विपुल लोहार, रमेश महामुलकर, दत्तात्रय शिर्के, जगदीश खंडागळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालन्याची कन्या सुकृती काकडेची सिनेसृष्टीत झेप

## पहिला मराठी चित्रपट डेरिंग द बारामती फाईल्स संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित

**ज्योतिर्मय साहित्य**

जालना - जालना येथील अभिनेत्री सुकृती काकडे हिने आपल्या अभिनयाच्या जोरावर सिनेसृष्टीत मोठी झेप घेतली असून, तिचा पहिला मराठी चित्रपट डेरिंग द बारामती फाईल्स जालना शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलीने सोशल मीडिया आणि रंगभूमीच्या माध्यमातून थेट मोठ्या पडद्यापर्यंत मारलेली ही धडक जालना जिल्ह्यातील तरुण कलावंतांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

**शालेय जीवनापासून अभिनयाची आवड:**

शहरातील रामनगर पोलीस कॉलनी भागात राहणाऱ्या सुकृतीने आपले पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण नवयुवक गणेश प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, जालना येथून पूर्ण केले. त्यानंतर जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पीरकल्याण येथून बारावीनंतर ती सध्या फॅशन



डिझायनिंगच्या प्रथम वर्षात शिकत आहे. लहानपणापासूनच अभिनयाची प्रचंड आवड असल्याने शाळेतील प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रमात ती आवर्जून सहभागी होत असे.

**सोशल मीडिया ते टी-सीरिजचा प्रवास:**

लॉकडाऊनच्या काळात सुकृतीने आपली कला लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सोशल मीडियावर व्हिडिओ बनवण्यास सुरुवात केली. तिच्या या प्रयत्नांना नेटिझन्सकडून मोठा प्रतिसाद मिळाला. या लोकप्रियतेमुळेच तिला टी-सीरिज मराठीच्या ''साजिरी मी'' आणि ''सजना रे'' या दोन प्रसिद्ध गाण्यांमध्ये मुख्य भूमिका साकारण्याची संधी मिळाली. या गाण्यांमुळे तिचा कॅमेरासमोरील आत्मविश्वास अधिक दृढ झाला.

**उत्कर्ष थिएटरने घडवला अभिनय:**


अभिनयातील बारकावे शिकण्यासाठी आणि योग्य मार्गदर्शनासाठी सुकृतीने जालना येथील उत्कर्ष थिएटर या नाट्यसंस्थेत २०२४ मध्ये प्रवेश केला. घोळमटण या पहिल्याच नाटकाद्वारे तिचा खऱ्या अर्थाने हौशी रंगभूमीवरील अभिनय प्रवास सुरू झाला. हे नाटक राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचले होते. त्यानंतर सुकृतीने अनेक एकांकिका, पथनाट्ये, दोन अंकी नाटके आणि नृत्यस्पर्धा गाजवल्या. या प्रवासात तिला कलाशिक्षक व चित्रकार असलेले वडील परमेश्वर काकडे, प्रसिद्ध अभिनेते संभाजी तांगडे, लेखक सतीश लिंगडे, दिग्दर्शक सुमीत शर्मा, सुंदर कुँवरपुरिया, सुनील शर्मा, रेखा चव्हाण, प्रेरणा सराफ कुलकर्णी, नीलेश सपकाळ, विनोद जैतमहाल आणि संस्थेच्या सर्व कलावंतांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**डेरिंग - द बारामती फाईलद्वारे मोठ्या पडद्यावर पदार्पण:** रंगभूमीवर काम करत असतानाच सुकृतीचे सोशल मीडियावरील कंटेंट मेकिंगही सुरू होते. यादरम्यान आदित्यराजे मराठी प्रॉडक्शनचे सर्वेसर्वा आदित्यराज मराठे यांच्याशी तिची ओळख झाली आणि याच ओळखीतून तिला डेरिंग द बारामती फाईल या चित्रपटात मुख्य भूमिकेची सुवर्णसंधी मिळाली.

### आईची खंबीर साथ, कुटुंबाचे स्वप्न पूर्ण

या यशाबद्दल बोलताना सुकृतीने सांगितले की, ''हा प्रवास सोपा नव्हता. मात्र, माझी आई नीता काकडे हिने मला प्रत्येक संकटात खंबीर साथ दिली. कुटुंबाच्या पाठिंब्यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचू शकले. मला मोठ्या पडद्यावर पाहण्याचे माझ्या घरच्यांचे स्वप्न होते, ते आज पूर्ण झाले असून कुटुंबाला माझा अभिमान वाटतो हीच माझी सर्वात मोठी कमाई आहे.''



## जात्यावरच्या ओव्या......

अरे पड ना पाण्या
किती पाहू तुझी वाट
भुकेली पाखरं, लेकर
भर जित्राबाच पोट ||७१५||

असे पड ना पाण्या
तुला लिहु का पतुर?
किडा, मुंगी ,जनावर
झाले शिवार आतूर ||७१६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ४४

ज्योतिर्मय साहित्य

**मना रे जनी मौन्य मुद्रा धरावी ।**
**कथा आदरे राघवाची करावी ।**
**नसे राम ते धाम सोडोनी द्यावे ।**
**सुखालागि आरण्य सेवीत जावे ।४४।**

अर्थ : हे मना, समाजात वावरताना शक्यतो मौन धारण करावे. बोलायचेच झाले तर अत्यंत आदराने श्रीरामाचे गुणगान करावे. ज्या ठिकाणी श्रीरामाबद्दल म्हणजेच भगवंताबद्दल प्रेम नाही अशा ठिकाणी राहू नये. ते ठिकाण तत्काळ सोडून द्यावे. भगवंताच्या नामातील सुख प्राप्त करण्यासाठी खुशाल अरण्यात जाऊन राहावे.


विवेचन : मन म्हणजे विचार करणे. ज्याला मन आहे तो माणूस ! म्हणजेच जो विचार किंवा चिंतन करू शकतो तो माणूस होय. मौन हा शब्द देखील मन या धातूपासून तयार झाला आहे. केवळ न बोलणे म्हणजे मौन नव्हे तर ज्याच्या अंतरात भगवंताच्या नामाचे चिंतन सुरू आहे आणि अन्य काही बोलण्याची ज्याला आवश्यकता राहत नाही अशी गोष्ट म्हणजे मौन. अशी व्यक्ती केवळ भगवंताचे गुणगान करण्याकरताच बोलते. त्याचीच कथा सांगते.



मौनाचा हा अर्थ साधकांसाठी सांगितला आहे. अनेक लोक आपला स्वार्थ साधण्यासाठी सोयीस्कर मौन धारण करतात. त्या अर्थाने मौन हा शब्द इथे अपेक्षित नाही. ''मौनम सर्वार्थ साधनं'' असे एक प्रसिद्ध संस्कृत वचन आहे. मौनाने सर्व काही साध्य होते असा त्याचा अर्थ आहे. जे लोक मौन पाळतात आणि वायफळ बडबड करत नाहीत, अशांच्या वाणीला सामर्थ्य प्राप्त होते. आपण बोलून जे साध्य करू शकत नाही ते मौनाने साध्य होते. अशा वेळी मौन हेच शस्त्र आणि शास्त्र ठरते. सतत बडबड करणाऱ्या लोकांच्या बोलण्याला लोक फारशी किंमत देत नाहीत.

काही अपवादात्मक साधुसंत खरोखरच साधनेसाठी मौन धारण करतात. परंतु बरेचसे साधू मौन तर धारण करतात, परंतु त्यांच्याकडे कोणी आले आणि त्यांना काही विचारले तर ते हातवारे करून बोलतात किंवा आपले म्हणणे पाटीवर लिहून सांगतात. काही साधुसंतांनी मौनाच्या काळात ग्रंथ देखील लिहिल्याचे ऐकण्यात येते. असे मौन खऱ्या अर्थाने पूर्ण मौन म्हणता येणार नाही. **(क्रमशः)**

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२





ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||


@संजय काव्या पुणे 7743918559



✍️ परीक्षा

परीक्षा ही आपल्या गुणवत्तेची चाचणी असते, तिला निर्भयपणे सामोरे जायचे असते, या कसोटी मधून गेल्यावर आपला आत्मविश्वास अधिक बळावतो, मजबूत होतो म्हणून जेवढी कठीण परीक्षा तेवढा तुमच्या अनुभवाचा, गुणवत्तेचा कस लागतो ते अग्निदिव्य तुम्हाला पार पाडता यायला हवे.

## लोकांचे मन दुखविणे ही हिंसाच !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

ही जी सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे तिची नक्कल म्हणजे चित्रकला होय. चित्रकाराने रंगविलेले चित्र खोटे असून जे खऱ्यासारखे भासते, त्याला उत्तम चित्र असे म्हणतात. भगवंताचे होऊन जी कला येईल ती खरी. भगवंताने आपल्याकडून जे करवून घेतले ती कला समजावी. जे कर्म भगवंताकडे न्यायला मदत करते ती कलाच होय. या कलेमध्ये मनाला गुंतविणे आणि उद्योगात राहणे ही भगवत्सेवाच आहे. मन म्हणजे कल्पनांचे मूर्त स्वरूप. मन चंचल आहे तोपर्यंत देहालासुद्धा स्वस्थता नाही. मनाची चलबिचल होते म्हणूनच अभ्यास करायला पाहिजे. मनाला शिक्षण देणे याचे नाव अभ्यास करणे. मनाची विश्रांती हीच खरी विश्रांती होय.

सृष्टीमध्ये सर्व ठिकाणी वैचित्र्य आढळते. प्राण्यांच्या कितीतरी जाती आहेत. माणसेसुद्धा एकासारखी एक कुठे असतात ? पण सर्वांमध्ये भगवंत मात्र सारखाच ओवलेला आहे. जगामधले प्राणी एकमेकाला मारक असूनदेखील कसे जगतात, हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. जगामध्ये माणूस आणि वाघ दोघेही राहतात. परंतु दोघांनाही एकमेकांची भीती असते, म्हणून एक दुसऱ्याला सहसा मारीत नाही. ज्याच्यामुळे दुसऱ्याच्या हिताचा घात होतो, अशा कृती करणे हे हिंसेचे लक्षण समजावे. भगवंताच्या आड येणाऱ्या वस्तूंची हिंसा करणे ही अहिंसाच होय. पण आपल्या स्वार्थाकरिता आणि बडेजावाकरिता लोकांचे मन दुखविणे, ही हिंसाच समजावी. दुसऱ्याचे मन दुखविणे म्हणजे भगवंताचे मन दुखविणे होय. आपल्या मनात आलेली गोष्ट आपल्या हातूनसुद्धा होत नाही, तर मग इतरांनी आपल्या मनासारखे वागावे असे म्हणणे, हे काही बरोबर नाही. आपल्याकडे बायका चातुर्मासामध्ये नियम करतात; उदाहरणार्थ, रोज एक वात लावायची, उजव्या हाताने पाणी प्यायचे, वगैरे. वास्तविक हे कसले नियम ! तुम्ही एक वात लावली काय आणि दोन वाती लावल्या काय, शेवटी दिवा लावावा लागतोच ! त्यापेक्षा, 'मी कुणाचे अंत:करण दुखविणार नाही' असा नियम करावा. प्रथम चार महिने करावा आणि मग वर्षभर पाळावा आणि नंतर जन्मभर ठेवावा. काही बायका चातुर्मासात मीठ सोडतात.

असे अळणी खाणारी बाई जेवायला बसली असताना मीठ वाढायला आलेल्या बाईला दुरूनच ' नको नको ' म्हणते; कारण न जाणो, चुकून मीठ किंवा मिठाचा पदार्थ पानात पडायचा ! हे जसे ती सांभाळते, त्याप्रमाणे आपण कुणाचे अंत:करण न दुखवण्याचा नियम केला की, आपण किती बेताने बोलू आणि कोणी आले तर आपण किती काळजीपूर्वक वागू! भगवंत चोहोकडे आहे असे आपण म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही, याला काय करावे ? भगवंताचे होऊन त्याच्या नामात राहावे हाच एक उत्तम मार्ग आहे.

अंतःकरण न दुखवता बोलणे, हे वाचेचे तप आहे असे म्हणतात.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

श्री हनुमानांची स्वभाव वैशिष्ट्ये

माणसाची पारख :

थोर श्रीराम भक्त श्री हनुमान, यांचे चरित्र श्रवणीय, वंदनीय आहेच आहे. त्यांच्या चरित्रातील कथानकांमधून आपण त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये जाणणार आहोत. यात प्रथम त्यांना माणसांची पारख कशी होती? याबद्दल आपण आता पाहू.

ज्यावेळेस पंचवटीत असताना कपटाने, रावणाने, सीता मातेचे हरण केले. मारिच्याची माया लक्षात येताच प्रभू रामचंद्र व लक्ष्मण हे परत आले. पाहतात तो झोपडीत सीता माता नाहीत. त्यांनी इतरत्र खूप शोध घेतला. शेवटी जटायुने, रावणाने त्यांना पळविले असल्याचे सांगितले. सीतेचा शोध घेत राम व लक्ष्मण हे दृश्य मुख पर्वतावर पोहोचले. हा परिसर घनदाट वनाचा निसर्ग रम्य असा होता. फळे फळे फुले यांनी बहरलेला. या दृष्य मुख पर्वतावर किश्किंदा नगरीचा राजा वाली याचा लहान भाऊ सुग्रीव तिथे लपून बसला होता. वाली व सुग्रीवात वितुष्ठ आले होते. त्यामुळे सुग्रीव त्याच्या निवडक साथीदारा सह या पर्वतावर लपून बसला होता. ज्यात हनुमंत ही सोबत होते. जेव्हा राम व लक्ष्मण आपले धनुष्य बाण घेऊन त्या पर्वतावर चढून येताना पाहिले, तेव्हा इतर वानर व सुग्रीव भयभीत झाले. त्यांना असे वाटले की, कदाचित यांना वाली ने आपली हत्या करण्यासाठी पाठवले असावे.

क्रमश:.....

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### फ्रॉड पासून सावध राहा

Pm youjna list open 2500.apk
तुमच्या कितीही जवळच्या किंवा भरवशाच्या व्यक्तीने तुम्हाला वरील प्रकारची एपीके फाईल पाठवली तर ती क्लिक करू नका. कारण ही सायबर भामट्यांनी बनवलेली एपीके फाईल आहे.
तुमच्या मित्राचा मोबाईल हॅक झालेला असेल आणि सायबर भामट्यांनी ही पोस्ट पाठवलेली असते.
क्लिक केल्यास तुमचा मोबाईल हॅक होईल आणि तुमची सगळी गोपनीय माहिती आयतीच सायबर भामट्यांपर्यंत पोहोचेल.
तुमच्याच नंबरवरुन तुमच्या फ्रेंड लिस्ट मधील सगळ्यांना हीच एपीके फाईल आपोआप फॉरवर्ड केली जाईल आणि तुमच्यावरच भरवसा ठेवून त्यातील काही लोक क्लिक करून त्यांचे पण नुकसान करून घेतील.
त्यामुळे सावध राहा. Pm youjna list open 2500.apk ही एपीके फाईल क्लिक करू नका.



## आरोग्य संजीवनी

## पुजेसाठीचा कापूर - बहुगुणी, प्रभावी आणि आयुर्वेदिक उपचारांचा राजा

ज्योतिर्मय साहित्य

कापूर फक्त पूजेसाठी पवित्र नसून, शरीरातील अनेक समस्या काही दिवसांत दूर करणारा नैसर्गिक उपाय आहे!

- कापूर घरातील नकारात्मकता दूर करतो
- शरीर-मन शांत ठेवण्याची अद्भुत क्षमता
- अँटी-बॅक्टेरियल, औषधी आणि त्वरित परिणाम करणारा घटक

चला जाणून घेऊ या अद्भुत फायदे

१) तणाव दूर करतो : कापराचा सुगंध मन शांत करतो. खोलीत कापूर ठेवला तर - तणाव कमी, मन प्रसन्न, रात्री उत्तम झोप

२) डोकेदुखीवर प्रभावी : कापूर + सुंठ + अर्जुनाची साल + पांढरं चंदन एकत्र बारीक करून कपाळावर लावा.

थोड्याच वेळात आराम जाणवेल!

३) स्नायू वेदना व खोकला आराम - मोहरी किंवा तिळाच्या तेलात कापूर टाकून मालिश करा.

- स्नायूंच्या वेदना कमी होतात, खोकल्यावर झटपट आराम

४) सर्दी-जंतुसंसर्गावर उपयोगी - गरम पाण्यात कापूर टाकून वाफ घेतल्याने सर्दी लगेच कमी होते.



संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) त्वचेसाठी उपयुक्त खोबरेल तेल + कापूर

- डाग कमी - त्वचा स्वच्छ

(तेलकट त्वचेसाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्या)

६) केस काळे व कोंड्यामुक्त : कापूर मिसळलेले तेल लावल्याने कोंडा कमी होतो व केस काळे राहतात.

७) हिवाळ्यात टाचांच्या भेगांसाठी - कोमट पाणी + कापूर पाय काही वेळ भिजवा पाय मऊ होतात भेगा बऱ्या होतात.

***

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी
संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### पावसाच्या सरी

पावसाच्या सरींनी पहा
सर्वत्र नव चैतन्याचा
बहर छान येतो
चिंब न्हावूनी धरा
माती-पाणी भेटीचा
सुगंध चौफेर दरवळतो

येता पावसाच्या सरी
वसुंधरा ओलीचिंब होता
सजीवसृष्टी आनंदाने सुखावते
ऊन-पावसाच्या खेळात
नाचता सान-थोर
इंद्रधनू आकाशी फुलते

# वट सावित्री पोर्णिमा

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ज्येष्ठ पौर्णिमेस वटसावित्री पौर्णिमा साजरी केल्या जाते. या दिवशी सत्यवान सावित्रीची कथा भक्तीने श्रवण केल्या जाते. ही सत्यवान सावित्रीची कथा महाभारत या ग्रंथात वनपर्वामध्ये, मार्कंडेय ऋषी युधिष्ठ रास सांगतात. एक पतिव्रता स्त्री आपल्या तपाचरणा मुळे व पतिभक्ती मुळे सामर्थ्य संपन्न होते. ती चतुराईने आपल्या पतीचे प्राण, प्रत्यक्ष यम धर्म राजाकडूनही, परत मिळविते. अशी, ही एक आदर्श स्त्रीची कथा आहे. ही कथा आपण आता विस्ताराने पाहू.

**कथानक**

फार प्राचीन काळी, मलय देशातील प्रभू वंशात एक थोर राजा होऊन गेला. तो पुण्य प्रतापी होता. धर्माप्रमाणे तो यथायोग्य न्याय करीत असे. तो सत्य वचनी होता. तो व्रतस्थ होता. प्रजाजणांच्या सेवेला तो प्रभुची सेवा समजायचा. त्याने अनेक यज्ञ केले होते.हा राजा लोक कल्याणकारी होता. त्यामुळे तो प्रजेचा लाडकाही होता. या राजाचे नाव *अश्वपती* असे होते.

अश्वपति हा भूतदयने व चांगुलपणाने प्रजेचा न्यायनिवाडा करीत असे. परंतु या राजाला अपत्य नव्हते. मुल व्हावे म्हणून त्याने अनेक व्रते केली. ऋषीमुनींच्या सांगण्यावरून त्याने कित्येक दिवस ब्रह्मचर्याचे पालनही केले. मित आहार घेऊन तो अनेक दिवस राहिला. होम हवन करून त्याने पुत्रप्राप्तीची इच्छा व्यक्त केली. त्याने सावित्री देवीचा जप केला. तो एकभूक्त राहून मोठ्या निष्ठेने हा जप करीत असे. असे अनेक वर्ष त्याचे तप झाले. या तपामुळे सावित्री माता त्याच्यावर प्रसन्न झाली. ती अग्नी होत्रातून बाहेर आली. तिने अश्वपतीला दर्शन दिले. ती म्हणाली हे अश्वपती तुझ्या ब्रह्मचर्याचा व्रतामुळे मी, तुझ्यावर प्रसन्न झाले आहे. तुझा भोगेंद्रिया वरील संयम पाहून मी तुला वरदान देते. पण तू तुझा पुण्यप्रभाव कमी होईल, असे कांही मागून नये. यावर राजा म्हणाला की, मी जे करतो, ते मी माझा पुण्य प्रभाव वाढावा म्हणूनच करीत असतो. माझ्या वंशात अनेक गुणी पुत्र जन्म घेवोत. ते माझ्या वंशाचे नाव अजरामर करो, असा वर द्यावा. सावित्री देवी म्हणाली, तुला एक कन्या प्राप्त होईल. जे तुझ्या नशिबात आहे, तेच तुला मिळणार आहे.



या वर प्राप्तीनंतर अश्वपतीची पत्नी काही काळातच गर्भवती झाली. योग्य वेळ येताच तिने एका सुंदर कन्येस जन्म दिला. सावित्री मातेच्या प्रसादाने ही कन्या प्राप्त झाल्यामुळे, हिचे नावही *सावित्री* असेच ठेवण्यात आले.

दिवसागणिक सावित्री मोठी होऊ लागली. तिचे सौंदर्य अधिकाधिक खुलून यायला लागले. तिच्या चेहऱ्यावर दैदीप्यमान तेज चमकत असायचे. या तिच्या कांतीमुळे प्रभावित होऊन, अनेक राजकुमार तीला घाबरत असत. ते सावित्रीशी विवाह करायला नको म्हणीत. सौंदर्य व कांती ही कधी कधी अडचणीची ठरते. तसेच झाले हिच्या तेजस्वी कांती मुळे सावित्रीशी विवाह करण्यास कोणीही समोर येईना.

मुलगी उपवर झाली, आता हिचा विवाह कसा करावा? या चिंतेत महाराज अश्वपती होते. या परिस्थितीचा विचार करून त्यांनी एकदा सावित्रीला असे सांगितले की, तुला स्वतःहून कोणीही राजा मागणी घालायला येत नाही. तेव्हा तूच तुझा पती निवडण्यासाठी बाहेर पड.तु अनेक स्थानांना भेट दे व तुला योग्य वाटेल त्या पुरुषाशी तुझा विवाह मी करून देईन. राजाने प्रधाना सोबत कांही सैन्य सावित्री सोबत दिले. ते अनेक देश फिरले, आणि बऱ्याच काळानंतर ते घरी आले.

सावित्रीने घरी येऊन वडिलांना हे सांगितले की, वनामध्ये शल्यवंशीय द्युमत सेन नावाचा राजा राहत आहे. हा राजा अचानक अंध झाल्याकारणाने त्याच्या राज्यातील एका सरदारांने त्याच्या विरुद्ध षडयंत्र रचले आणि त्याला पदच्युत करून आपण गादीवर बसला. द्युमत्सेन राजा नाईलाज झाल्याने व अंधत्व आल्याने शेवटी वनात येऊन राहिला. या राजाला एक तरूण देखणा मुलगा सत्यवान हा आहे .मला हा मुलगा पसंत पडला आहे. तुम्ही माझा विवाह त्याच्याशी लावून द्या. कारण मनाने मी याला वरले आहे.

पिता-पुत्रीचे हे संभाषण चालू असतानाच आकाश मार्गातून नारद स्वामी तिथे अवतरले. अश्वपतीने नारदांचे यथायोग्य स्वागत केले. त्यांना आसनावर बसविले व त्यांना अर्घ्य, पुष्प अर्पण करून त्यांचे स्वागत केले. नारदाने प्रश्न केला की, राजा तुझी मुलगी आता उपवर झाली आहे. तेव्हा तिच्या विवाहाचा विचार तू का करीत नाहीस. तेव्हा सावित्रीने सत्यवानाची हकीकत त्यास सांगितली. अश्वपतीने नारदांना विचारले की, नारद मुनी, तुम्ही सत्यवानाला जाणता काय? आणि तो मुलगा कसा आहे? नारद मुनी म्हणाले, हो मी त्याला जाणतो.

**आपले सण, आपले उत्सव**
**मधुकर बोरीकर, पुणे**
**9403061886**

अश्वपती, नारदास विचारतात, सत्यवान आपल्या पित्याशी प्रामाणिक आहे काय? त्याच्यात ती ऊर्जा आहे काय? ज्यामुळे तो एक चांगला राजा होऊ शकेल. नारद म्हणतात तो ऊर्जेत साक्षात सूर्य आहे. शहाणपणात ब्रह्मदेव आहे. शौर्यात इंद्र आहे. दानशूरतेत तो पृथ्वी आहे.

अश्वपती पुन्हा विचारतो की, तो दान करण्यात कसा आहे? तो देखणा आहे काय? त्याची प्रवृत्ती दिलदार व दानशूर आहे का? यावर नारद म्हणतात, तो कुवती प्रमाणे दान करतो. पण तो उधळा नाही. तो रती देवासारखा आहे. त्याचा सत्याचा आग्रह आहे. तो चंद्रासारखा सुंदर आहे .पुरुषार्थात तो पराक्रमी आहे. सौंदर्यात तो अश्विनी कुमार आहे. तो नम्र असला तरी तो प्रामाणिक आहे. स्वात्विक आहे स्वाभिमानी आहे.

त्याकाळी वराकडून काय अपेक्षा ठेवायचे? याचा जर आपण विचार केला तर, आज आपण त्याला किती पॅकेज आहे? त्याचे आई-वडील त्याला सांभाळावे लागतील काय? त्याला थ्री बीएचके फ्लॅट आहे का? असे स्वार्थ लोलूप प्रश्न विचारतो. आता अश्वपतीच्या प्रश्नाकडे पहा, किती उच्च विचाराचे हे प्रश्न आहेत.

सद्गुणाचा ठेवा असणारा वर हवा. मग तो वनात राहणारा का असेना! ही किती उच्च विचारसरणी आहे? आपण किती कोत्या विचारसरणीने चालतो, हे लक्षात येते.

अश्वपती राजा नारदांना म्हणतो, तुम्ही त्याचे अनेक गुण सांगितलेत, आता त्याचे दोषही सांगा. नारद म्हणतात, त्याच्यात केवळ एकच दोष आहे, तो म्हणजे त्याचे आयुष्य आणखी केवळ एकच वर्ष शिल्लक आहे.

**(क्रमशः)**

# भिंती जवळ आल्या पण... मनं दुरावली!

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


दुपारच्या संथ वेळी फ्लॅटच्या बंद दाराकडे पाहताना अचानक बालपणीचा तो गजबजलेला ओटा आठवतो आणि डोळे नकळत ओलावतात. काळ किती वेगाने बदलतो ना? एकेकाळी आपली घरं मातीची होती, पण त्यातली माणसं मात्र सोन्यासारखी होती. घराला कुंपण नसायचं आणि मनाला कवाडं नसायची.

कधी एखाद्या घरातून फोडणीचा खमंग वास आला की बाजूच्या चार घरांनाही भूक लागायची. वाटीभर साखर असो की चिमूटभर मीठ, ते मागण्यासाठी कोणाच्याही परवानगीची गरज नसायची. कुणाकडे पाहुणे आले की अख्खा शेजार कामाला लागायचा. तो शेजारधर्म म्हणजे केवळ ओळखीचं नातं नव्हतं, तर प्रत्येक सुख-दुःखात हक्काचा आणि मायेचा आधार होता.

आज आपण प्रगती केली आहे. सिमेंटची उंचच उंच जंगलं उभी राहिली आहेत. आपल्या घरांच्या भिंती एकमेकांना इतक्या खेटून आहेत की शेजारच्या घरातल्या टीव्हीचा आवाज स्पष्ट ऐकू येतो; पण त्या माणसाच्या मनातला हुंदका मात्र ऐकू येत नाही. हीच आजची खरी शोकांतिका आहे.

आपण रोज एकाच लिफ्टमधून वर-खाली जातो; पण नजरानजर टाळण्यासाठी मोबाईलच्या स्क्रीनमध्ये मान खुपसून बसतो. प्रायव्हसी आणि स्टेटस च्या नावाखाली आपण स्वतःभोवती अशा काही अदृश्य भिंती उभ्या केल्या आहेत की त्यात आपण सुरक्षित कमी आणि एकटे जास्त झालो आहोत.

पूर्वी सण-उत्सव म्हणजे अख्ख्या गल्लीचा सोहळा असायचा. कोणा एकाच्या घरचं सुख संपूर्ण वस्तीचं असायचं आणि कोणा एकाच्या घरचं दुःख सगळ्यांच्या




डोळ्यांत पाणी आणायचं. आता सण फक्त व्हॉट्सॲपच्या स्टेटसवर साजरे होतात. शेजारच्या दाराला तोरण लागलंय की कुलूप, हे पाहायलाही कुणाला सवड उरलेली नाही.

विशेषतः घरातल्या वृद्धांकडे पाहिलं की जास्त वाईट वाटतं. ज्यांनी उभं आयुष्य माणसांच्या गराड्यात घालवलं, ती माणसं आज खिडकीतून बाहेर पाहत कोणातरी ओळखीच्या चेहऱ्याची, एका साध्या नमस्काराची वाट पाहत असतात. पण बाहेरून जाणारा प्रत्येकजण घड्याळाच्या काट्यावर धावतोय.

घरांच्या भिंती जवळ आल्या असल्या तरी मनांमधली अंतरं मात्र वाढत चालली आहेत. एकाच इमारतीत राहूनही माणसं एकमेकांसाठी अनोळखी झाली आहेत. घरे मोठी झाली, सुविधा वाढल्या; पण मनाची अंगणं मात्र आक्रसून गेली आहेत.

***मंगेश दौंडकर, पुणे,***
***मो.- 9890619354***



आपण हे विसरत चाललोय की, ज्या दिवशी आपल्यावर एखादं संकट येईल, त्या दिवशी याच शेजारच्या दारावर आपल्याला हक्काने टकटक करावी लागणार आहे.

वेळ अजूनही गेलेली नाही. कधीतरी सहज शेजारच्या दारावरची बेल वाजवून बघा. ''कसे आहात?'' एवढा एक साधा प्रश्नही समोरच्याच्या चेहऱ्यावर हसू फुलवू शकतो. कारण लक्षात ठेवा, माणूस हा माणसाशिवाय अपूर्ण आहे. सिमेंटच्या या निर्जीव भिंतींना खऱ्या अर्थाने घरपण तेव्हाच लाभेल, जेव्हा त्यात पुन्हा एकदा शेजारधर्माचा ओलावा जपला जाईल.

**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## ज्ञान, मूल्ये आणि शिक्षण व्यवस्थेची वास्तविकता

ॲड. प्रा. कौशिक म. हरणे मो. ९६७३१७५१९७



पुढे......

पारदर्शकता आणि शैक्षणिक प्रामाणिकता यांचे पालन होणे तितकेच आवश्यक आहे.

या प्रक्रियेत सर्वाधिक नुकसान विद्यार्थ्यांचे आणि प्रामाणिकपणे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांचे होते. अनेक प्राध्यापकांचा बहुमोल वेळ अध्यापन, संशोधन आणि विद्यार्थी मार्गदर्शन यांमध्ये खर्च होण्याऐवजी विविध समित्या, अहवाल, डेटा संकलन, पुरावे गोळा करणे आणि प्रशासकीय कामांमध्ये खर्च होतो. परिणामी वर्गखोलीतील अध्यापन, विद्यार्थ्यांशी संवाद आणि त्यांच्या शैक्षणिक समस्यांचे निराकरण या मूलभूत जबाबदाऱ्यांकडे दुर्दैवाने दुय्यम दृष्टीने पाहिले जाते. वास्तविक पाहता, कोणत्याही शिक्षण संस्थेची खरी ओळख तिच्या NAAC किंवा NBA च्या श्रेणीत नसते; ती त्या संस्थेतून घडलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत असते. एखादी संस्था A, A+, A++ दर्जा मिळवू शकते; परंतु जर त्या संस्थेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होत नसेल, तर त्या मानांकनाचे मूल्य केवळ कागदावरच उरते. शिक्षण व्यवस्थेचे केंद्र विद्यार्थी असले पाहिजेत; परंतु जेव्हा मानांकन हेच अंतिम ध्येय बनते, तेव्हा शिक्षणाचा आत्माच हरवण्याचा धोका निर्माण होतो.

म्हणूनच मानांकनांच्या मागे आंधळेपणाने धावण्याची नव्हे, तर शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांकडे पुन्हा एकदा गांभीर्याने पाहण्याची आज गरज आहे. शिक्षण संस्थांनी श्रेणी, गुणांकन आणि कागदोपत्री यश यांपेक्षा गुणवत्तापूर्ण शिक्षण, चारित्र्यनिर्मिती आणि ज्ञानसंवर्धन यांना प्राधान्य दिले पाहिजे. A, A+ किंवा A++ या श्रेणी शिक्षण संस्थेची प्रतिष्ठा वाढवू शकतात; परंतु त्या विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची, नैतिकतेची आणि ज्ञानाची हमी देऊ शकत नाहीत. शिक्षणाचा खरा दर्जा अहवालांच्या पानांवर सिद्ध होत नसतो, तो विद्यार्थ्यांच्या विचारांमध्ये, त्यांच्या आचरणात आणि समाजासाठी दिलेल्या योगदानामध्ये प्रतिबिंबित होत असतो. कारण इतिहासात कोणतीही संस्था तिच्या मानांकनांमुळे, अहवालांमुळे, दस्तऐवजांमुळे किंवा तिच्या भिंतींवर लावलेल्या प्रमाणपत्रांमुळे महान ठरलेली नाही; तर ती महान ठरते तिच्या वर्गखोल्यांमधून घडलेल्या विचारवंतांमुळे, तिच्या शिक्षकांच्या प्रामाणिकतेमुळे आणि समाजात मूल्यांची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे.

आज आपण अशा काळात जगत आहोत, जिथे पदव्या वाढत आहेत; परंतु मूल्ये कमी होताना दिसत आहेत, माहिती वाढत आहे; परंतु विवेक कमी पडताना दिसत आहे, करिअर घडत आहेत; परंतु चारित्र्य घडविण्याकडे दुर्लक्ष होत आहे. अशा वेळी शिक्षण व्यवस्थेने स्वतःला एक मूलभूत प्रश्न विचारण्याची गरज आहे—आपण केवळ पदवीधर घडवत आहोत की खऱ्या अर्थाने सुशिक्षित नागरिक घडवत आहोत?

शिक्षणाचे यश हे विद्यार्थ्यांच्या हातातील प्रमाणपत्रांच्या संख्येवर मोजले जाऊ नये; तर त्यांच्या विचारांच्या प्रगल्भतेवर, नैतिकतेवर, सामाजिक बांधिलकीवर आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानावर मोजले गेले पाहिजे. कारण ज्ञान माणसाला सक्षम बनवते, कौशल्य त्याला यशस्वी बनवते; परंतु मूल्येच त्याला माणूस बनवतात. म्हणूनच शिक्षण व्यवस्थेचे अंतिम ध्येय केवळ रोजगारनिर्मिती नसून व्यक्तिमत्त्वनिर्मिती असले पाहिजे. ज्या दिवशी शिक्षण संस्था मानांकनांपेक्षा विद्यार्थ्यांच्या चारित्र्याला, अहवालांपेक्षा प्रामाणिकतेला आणि कागदोपत्री गुणवत्तेपेक्षा वास्तविक ज्ञानाला अधिक महत्त्व देतील, त्या दिवशीच शिक्षण व्यवस्थेचा खरा उद्देश साध्य होईल. कारण राष्ट्राची उंची त्याच्या इमारतींनी, अर्थव्यवस्थेने किंवा तंत्रज्ञानाने ठरत नाही; ती ठरते त्या राष्ट्रातील नागरिकांच्या विचारांनी, मूल्यांनी आणि चारित्र्याने. आणि त्या चारित्र्यनिर्मितीची सुरुवात नेहमीच वर्गखोलीतून होत असते.

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495






### "महाजनो येन गत: स पंथ:" ...

४. "महाजनो येन गतः स पन्थाः"
येथे महाजन म्हणजे केवळ प्रसिद्ध व्यक्ती नव्हेत, तर ज्यांनी सत्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे असे आत्मज्ञानी महापुरुष.
उदा. – श्रीराम, श्रीकृष्ण, आदि शंकराचार्य, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम , ज्यांच्या जीवनात ज्ञान, करुणा, निःस्वार्थता आणि धर्मनिष्ठा प्रकट झाली आहे, त्यांच्या आचरणातून धर्माचा मार्ग समजतो.
या श्लोकाचा सार
धर्म हा केवळ कोरड्या तर्काचा विषय नाही; तो शुद्ध अंतःकरण, शास्त्रविवेक आणि महापुरुषांच्या आचरणाच्या प्रकाशात जाणण्याचा विषय आहे.
संत ज्ञानेश्वरांनीही याच भावनेने म्हटले आहे–
"जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ॥"
म्हणजेच, धर्माचा अंतिम आधार बाह्य वाद नव्हे, तर अंतःकरणातील ईश्वरदृष्टी आणि महात्म्यांचा जीवनमार्ग हा आहे.
या न्यायाने आपला जाज्वल्य इतिहास समजून घेणे व जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे, हीच मानवी जीवनाची सार्थकता आहे.
"अश्वत्थामा हतः... नरो वा कुंजरो वा" हा प्रसंग महाभारतातील अत्यंत गहन धर्मसंकटाचा प्रसंग मानला जातो. येथे केवळ सत्य-असत्याचा प्रश्न नसून राजधर्म, आपद्धर्म, क्षात्रधर्म आणि लोकसंग्रह यांचा संघर्ष दिसून येतो.
१. धर्माचे सूक्ष्म स्वरूप
महाभारतात अनेक ठिकाणी धर्माचे स्वरूप अत्यंत सूक्ष्म असल्याचे सांगितले आहे –
सूक्ष्मो धर्मः सुदुर्ज्ञेयः।
धर्म अत्यंत सूक्ष्म असून त्याचा निर्णय करणे सोपे नाही.
तसेच महाभारतात म्हटले आहे –
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां
महाजनो येन गतः स पन्थाः॥
– महाभारत, वनपर्व ३१३.११७
धर्माचे तत्त्व गूढ आहे; म्हणून श्रेष्ठ महापुरुषांनी ज्या मार्गाने आचरण केले, तोच मार्ग ग्राह्य मानावा.
२. द्रोणवधाचा मूळ श्लोक
द्रोणाचार्यांना भ्रमित करण्यासाठी युधिष्ठिरांनी उच्चारलेले वचन असे दिले जाते –
अश्वत्थामा हतः इति गजो वा नरोऽपि वा।
किंवा प्रचलित रूप – क्रमशः......





### १. रासायनिक खते (Chemical Fertilizers)


खताचा प्रकार / नाव पिकांना लागू होण्याचा कालावधीजमिनीत असर संपण्याचा कालावधी विशेष नोंद
शेणखत / कंपोस्ट ३० ते ४५ दिवस १ ते २ वर्षे शेणखत जमिनीत पूर्णपणे जिवाणूंद्वारे कुजल्यानंतरच पिकाला मिळते. याचा फायदा जमिनीचा पोत सुधारण्यासाठी दीर्घकाळ होतो.
गांडूळ खत (Vermicompost) १५ ते २० दिवस ६ ते ८ महिने शेणखतापेक्षा लवकर लागू होते कारण ते आधीच प्रक्रिया झालेले असते.
पेंडी खते (कडुलिंब / एरंडी पेंड)१५ ते २५ दिवस ३ ते ४ महिने पेंडी हळूहळू कुजतात आणि किडींपासूनही पिकाचे रक्षण करतात.
जिवाणू खते (PSB, रायझोबियम, Azotobacter) ७ ते १२ दिवस जोपर्यंत जमिनीत ओलावा आणि सेंद्रिय कर्ब आहे हे थेट अन्नद्रव्य देत नाहीत, तर जमिनीतील नत्र आणि स्फुरद विरघळवून पिकाला उपलब्ध करून देतात.
३. विद्राव्य खते (Water Soluble Fertilizers - ड्रिप किंवा फवारणी)
ही खते अत्यंत आधुनिक असून ती १००% पाण्यात विरघळतात, त्यामुळे यांचा 'ॲक्शन टाईम' सर्वात जलद असतो.
खताचा प्रकार / नाव पिकांना लागू होण्याचा कालावधीजमिनीत/ पानांवर असर संपण्याचा कालावधी विशेष नोंद
फवारणीद्वारे (Spraying) थेट काही तासांत (२ ते १२ तास) ३ ते ५ दिवसपानांमधील छिद्रांद्वारे (Stomata) अन्नद्रव्ये थेट शोषली जातात. त्वरित रिझल्टसाठी सर्वोत्तम.
ड्रिपद्वारे (Drip - १८:१८:१८, १२:६१:०, ०:५२:३४) १ ते २ दिवस ७ ते १० दिवस मुळांच्या कार्यकक्षेत थेट पाणी आणि खत जात असल्यामुळे पिके ते लगेच शोषून घेतात.











































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

## दवाखाना

# टायफॉईड (६)

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो,

''उपचारापेक्षा प्रतिबंध प्रत्येक दृष्टीने चांगला'' हा सुविचार टायफॉईड या आजाराला निर्विवादपणे लागू होतो. तो न होण्यासाठी प्रतिबंधक उपायांमध्ये वैयक्तिक स्वच्छता सर्वात महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे आहे, या शिवाय स्वच्छ परिसर, पिण्याचे स्वच्छ पाणी, संभावित संक्रमित रोग्यांचा आणि वाहकांचा शोध आणि त्यांच्यावर योग्य ते उपचार हे मुद्दे आहेतच. एखादी व्यक्ती अशा ठिकाणी प्रवास करीत असेल, जिथे टायफॉईड स्थानिकरित्या खूप प्रमाणात आढळतो (इथे जिवाणूंच्या प्रतिरोधाचा इंपोर्टेड नाही तर स्थानिक डेटा हवा) तिथे डॉक्टर त्या व्यक्तीसाठी मानकानुसार अजिथ्रोमाइसिन किंवा सेफिक्साईमसारख्या औषधांची शिफारस करतात.

टायफॉइड लस: सध्या आपल्या देशात प्रामुख्याने टायफॉइड कॉन्ज्युगेट (टी.सी.व्ही.) लस वापरली जाते, कारण ही रोगापासून दीर्घकाळ संरक्षण प्रदान करते. लहान मुलांच्या प्राथमिक लसीकरणात या टायफॉइड लसीचा समावेश करण्यात येत असतो. दर ३ ते ५ वर्षांनी या लसीचा बुस्टर डोस (अनुवर्धी मात्रा) घ्यावा लागतो. हीच लस संबंधित प्रौढांसाठी वापरतात. लहान मुलांच्या मांडीच्या बाहेरील बाजूस आणि प्रौढांच्या दंडाच्या स्नायूंमध्ये ही लस टोचली जाते.

लसीकरणानंतर इंजेक्शन दिलेल्या जागेवर लालसरपणा, सूज, वेदना, हलका ताप किंवा अंगदुखी सारखे काही किरकोळ दुष्परिणाम दिसू शकतात. ही तात्पुरती लक्षणे १-२ दिवस राहतात. आधुनिक टायफॉइड कॉन्ज्युगेट लस चांगलीच म्हणजे ८४-८७ % परिणामकारक आहे. ती ६ महिन्यांच्या बालकांपासून ते प्रौढांपर्यंत अत्यंत सुरक्षित मानल्या जाते. या उलट जुनी पॉलिसेकेराइड लस ५० ते ६०% परिणामकारक आहे आणि ती २ वर्षांवरील बालकांपासूनच वापरल्या जाऊ शकते.

इथे एक गोष्ट आवर्जून नमूद करते. भारतात तोंडी देण्यास योग्य अशी कुठलीच प्रमाणित (औषध वापरण्यास शासनाकडून परवाना आवश्यक असतो) टायफॉईडची लस उपलब्ध नाही. याचे मुख्य कारण या तोंडावाटे देण्यात येणाऱ्या लसीची रोगप्रतिकारशक्ती तुलनेने कमकुवत आहे. भारतात टायफॉइडच्या संसर्गाचा धोका बघता अत्यंत प्रभावी अशी टायफॉइड कॉन्ज्युगेट लसच योग्य आहे. मंडळी, अगदी लहान मुलांना इंजेक्शनची सुई टोचण्याने विशेष फरक पडत नाही, थोडा वेळ रडून झाले की ही निरागस बालके पुन्हा हसत खेळत आयुष्याला सामोरे जातात. खरा प्रश्न असतो त्यांच्या पालकांचा आणि इंजेक्शनपासून लई लांब पळणाऱ्या मोठ्यांचा! असो!






टायफॉईडचे संक्रमण टाळण्यासाठी प्रौढांचे लसीकरण

*टायफॉइडचा प्रादुर्भाव असलेल्या प्रदेशांमध्ये, विशेषत: विकसनशील देशांमध्ये प्रवास करणारी विकसित देशातील व्यक्ती

*व्यावसायिक आरोग्य सेवा केंद्रात कार्यरत कर्मचारी आणि अधिकारी, तसेच टायफॉइडचा उच्च प्रादुर्भाव असलेल्या भागात तैनात केलेले लष्करी कर्मचारी

*टायफॉईड वाहकांच्या अतिशय जवळच्या संपर्कातील व्यक्ती

*कमकुवत रोगप्रतिकार प्रणाली असलेल्या व्यक्ती (उदा. केमोथेरपी घेत असलेल्या किंवा एचआयव्ही-एड्स बाधित व्यक्ती

*सूक्ष्मजीवशास्त्राच्या प्रयोगशाळेतील तंत्रज्ञ आणि इतर संबंधित व्यक्ती

टायफॉइड लसीकरण प्रमाणपत्र

*अन्न तयार करणे, शिजवणे किंवा वाढणे या कामात रेस्टॉरंट, हॉटेल्स इत्यादींमधील सहभागी असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांकडे वैध टायफॉइड लसीकरण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. मैत्रांनो, या अन्न तयार करणाऱ्या व्यक्तींची व्याप्ती किती मोठी असू शकते हे आपण रस्त्यावर दुतर्फा लागलेल्या लहान खाद्यपदार्थांच्या टपऱ्या, फिरत्या लहान व्हॅन आणि हातठेल्यांकडे निव्वळ एक नजर टाकताच कळून येते. औषधांची एक्सपायरी डेट वारंवार चेक करून खात्री करणारे आपण अशा अवैध स्थानी विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांना एक्सपायरी अवर असतो हे सोयीस्करपणे कां विसरतो?

*संबंधित जिल्हास्तरीय अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी अशा व्यक्तींच्या लसीकरण प्रमाणपत्रांची पडताळणी केल्यास या अवैधतेस आळा नक्कीच बसेल. सामान्य नागरिक म्हणून आपल्याही कांही जबाबदाऱ्या आहेत की! अशा वस्तू खाणारे आहेत म्हणून विकणारे देखील आहेत. अधिक काय बोलणे? जरा कुठे आठ पंधरा दिवस सतत बाहेरचे खाणे झाले की घरच्या साध्या सकस वरण, भात, भाजी, पोळीची सय येते की नाही?

*लसीकरणासोबतच, अन्न हाताळणाऱ्यांची वार्षिक वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे. त्यात ते टायफॉइड आणि इतर संसर्गजन्य रोगांचे वाहक नाहीत याची खात्री करण्यासाठी चाचण्यांचा समावेश असतो. (आठवा टायफॉईड मेरीला!)

*एवढ्यावर न थांबता जर



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

एखादा स्वयंपाकी किंवा अन्न हाताळणारी व्यक्ती टायफॉइडने संक्रमित असल्याचे आढळल्यास, ती पूर्णपणे बरी होईपर्यंत आणि वैद्यकीय चाचण्यांद्वारे जिवाणूमुक्त असल्याचा वैद्यकीय पुरावा सादर करेपर्यंत कामावर येऊ शकणार नाही. अशा कर्मचाऱ्यांच्या भरवशावर एरवी नफा कमावणाऱ्या मालकांनी त्यांचा वरील वैद्यकीय चाचण्यांचा आणि इतर खर्च करणे आणि त्यांना पगारी रजा देणे माणुसकीला धरून असेल. मी तर म्हणेन की कामाच्या व्यवस्थापनातच हे समाविष्ट करण्यात यावे.

आजच्या घडीला देखील जगातच नव्हे तर आपल्या देशातही टायफॉइडचा प्रादुर्भाव ही मोठी आरोग्य समस्या आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, जगभरात दरवर्षी सुमारे ९० लाख ते २ कोटी लोक टायफॉइडच्या संसर्गामुळे आजारी पडतात आणि सुमारे १ लाख लोकांचा मृत्यू होतो. यात सर्वाधिक प्रभावित क्षेत्रे अर्थातच प्रामुख्याने आशिया, आफ्रिका आणि विकसनशील देश आहेत. भारतात दरवर्षी अंदाजे ४९ लाख रुग्ण आढळतात (मृत्यूचे प्रमाण अंदाजे ८००० रुग्ण). या आकडेवारीने भारताला याबाबतीत तरी उच्च स्थानी प्रस्थापित केले आहे. ही खेदजनक बाब आहे. जखमेवर मीठ चोळणारे तथ्य म्हणजे महाराष्ट्र आणि कर्नाटक या पुरोगामी राज्यांमध्ये टायफॉइडचा प्रादुर्भाव सर्वाधिक असून, या दोहोंचे मिळून हे प्रमाण राष्ट्रीय आकडेवारीच्या एक तृतीयांश इतके आहे.

# आपली गो माता



ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

दूरदर्शीपणाने जपले पाहिजे. तज्ञाकडून प्राप्त माहिती नुसार गो मातेला गुळ, सैंद्वर्य मीठ, हि रवा चारा, हरबऱ्याची दाळ शुद्ध पाणी द्यावे. पण शिजलेले अन्न, खराब झालेली भाजी, सडलेले किंवा शिळे पदार्थ, उष्ट्या पत्रावळी, केळी ची उष्टीची पाने , देण्याचे कटाक्षाने टाळले पाहिजे. करडी ची पेंड किंवा सरकी नित्य नियमाने द्यावे. त्याच प्रमाणे गो पूजन करताना वातीची ज्योत सौम्य असावी, कापूर ज्योत, उदबत्ती किंवा धूप इत्यादी गोष्टी टाळाव्यात. ह्यातच गोसेवा करण्याचे पुण्य आहे

गो मातेच्या दुधामध्ये पोषक तत्वे जी माणसाला सुदृडतेसाठी आवश्यक असतात ती पूर्णत्वाने असतात. गाईच्या दुधा पासून तयार केलेले तूप आग्नित टाकले असता ऑक्सिजन निर्मिती होते म्हणून यज्ञ यागादी धार्मिक कार्यक्रमासाठी गायीचे तूप वैध आहे. अशी ही जीवनात सुलभता निर्माण करणारी सजीव प्राणी म्हणून गोमाता गणली जाते. देशातील आठ कोटीहून अधिक लोक गोपालनातून रोजगार उपलब्ध करून घेतात. दिवसे दिवस हा व्यवसाय प्रगतिकडे छेपावत आहे. दुध व्यवसायातून भारताच्या उत्पन्नात लक्षवेधी वृद्धी होत आहे. सरकारही पशुपालनाला महत्व देत आहे. त्यासाठी आर्थिक सहाय्यपण शेतकऱ्यात देवून शेतीसाठी पूरक व्यवसाय म्हणून प्राधान्य देत आहे. गो रक्षणासाठी जागृती निर्माण करण्याचे यशस्वी प्रयत्न अनेक संस्थेच्या माध्यमातून करताना दिसत आहे. प. विजय शंकर यांच्या मते गाय ही ग्रामीण अन शहरी जीवनाला जोडणारी एक दुवा आहे. ग्रामीण भागात संस्कृती पूर्ण जीवन केवळ गोमाते मुळे स्थिर आहे.

पद्म पुराणानुसार गाईला सर्व दियमसी मानले जाते. तीच्या प्रत्येक अवयवात वेगवेगळ्या दैवी शक्तीचा निवास असल्याचे वर्णणअसून धरती विकासात, मानव आरोग्य संवर्धनात गायीचा मोठा वाटा आहे, तो आणखी जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे




कारण एक वर्षात एक गाय जितके शेण मुत्र देते त्यापासून साधारण पणे ३० एकर शेतीसाठी आवश्यक असणारे जीवामृत व सेंद्रीय खत प्रयत्न करून तयार होवू शकते.. त्या मुळे रासायनीक खतांचा भरमसाठ खर्च कमी होवू शकतो. गोआधारित सेंद्रीय खत वापरातून मनुष्यही नैसर्गिक अन्नाचा आस्वाद घेवून आपले आरोग्य काही अंशी यशस्वीपणे जपू शकतो.

म्हणून गोरक्षणाला आपल्या जीवन संग्रामात प्राधान्य अबाल-वृद्धानी दिले पाहिजे आणि आपली संस्कृती जपली पाहिजे. श्रीकृष्णानी मनुष्य रूपात गोमातेची सेवा केली आहे. हा आदर्श घेवून आपण पुढे झेपावले पाहिजे.

***

# आडनाव पुराण

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या मराठी भाषेत एकापेक्षा एक वैशिष्ट्यपूर्ण आडनावे आढळतात. आणि गंमत म्हणजे, ही आडनावे आली कुठून? कशी पडली असावीत? हा प्रश्न मला नेहमीच पडतो.

सोनपावलांचा योगायोग :

सुमारे ३० वर्षांपूर्वीची गोष्ट. मी परभणीला होतो. महालक्ष्मीचे आगमन नुकतेच झाले होते. बायको रचना म्हणाली, ''विचारा बरं कोण आलंय? मी म्हणेन, सोन्याच्या पावलांनी महालक्ष्मी आली.''

त्याच सुमारास भावाचा फोन आला, ''मी परभणीला येतोय. सोबत माझे सहकारी सोनपावले पण आहेत.''

काय योगायोग! खरोखरच सोनपावले दारात उभे. अशी ही आडनावाची पहिली गंमत.

एका मोठ्या हॉस्पिटलमधली नावांची यादी-

परवा एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. तिथल्या डॉक्टरांच्या नावांच्या पाट्या वाचल्या मुंगळे, कावळे, आवळे, भाजीभाकरे, कोंडे, मांडे, भातलवंडे, खोडवे, गाढवे, तांबटकर, कापूसकर, तुपकर, साखरपुडे, सूपकर, कढीवाले. ऐकायला वेगवेगळी वाटली, पण प्रत्येक नावामागे नक्कीच काही इतिहास, काही गोष्ट दडलेली असणार.

तुपकर यांच्याकडे जेवणात तूप कमी पडत नसेल आणि साखरपुडे यांचं बोलणंही साखरेसारखं गोड असेल का? या प्रश्नाचे उत्तर साखरपुडे साहेब भेटल्यावरच कळेल.

राजे, काजे, वाझे, बाजे.

माझ्या मित्रांमध्ये राजे, काजे, वाझे, बाजे, या आडनावाचे मित्र आहेत.

राजे मित्राला विचारलं, ''हे आडनाव कसं?'' तो हसून म्हणाला, ''पूर्वी आमचे पूर्वज राजे होते. मोठे राजवाडे होते. काळाच्या ओघात वाडे गेले, पण राजे हे आडनाव मात्र टिकून राहिलं.''

बाजे मित्र म्हणाला, ''आमच्याकडे पूर्वी वाजंत्री वाजवण्याची परंपरा होती.'' त्यावरून आडनाव.''

काजे आणि वाझे या आडनावांमागचा इतिहास मात्र मी अजूनही शोधतोय.

रंगेबिरंगी आडनावे:-

आडनावांमध्ये रंगांची तर कमालच आहे. काळे, गोरे, पांढरे, लाल, , निळे, अशी कितीतरी रंगाची आडनावे आहेत.

माझे एक मित्र काळे आहेत, पण रंग आणि मनाने एकदम गोरे. गोरे साहेब ही गोरे आहेत. माझे ऑफिस मधील

लाल सरांचं नाक, राग आला की खरंच लाल होत असे, हा योगायोग की आणखी काही?

पांढरे आजोबा म्हणतात, ''आमच्या नावातच शांती आहे.

खानझोडे ते कल्याणे, उगले, नगारे.

एक जवळचे मित्र आहेत खानझोडे. मूळचे देशपांडे, पण हे आडनाव का? त्यांनी हळूच सांगितलं, ''यामागची गोष्ट मोठी गंमतीशीर आहे, जरा शांतपणे हे आडनाव

अर्ध अर्ध करून वाचलं की त्यातलं गुपित उलगडेल.

चार वर्षांपूर्वी कल्याणे हे आडनाव ऐकलं. आणि अनुभव असा की, या आडनावाची माणसं खरंच दुसऱ्याच्या कल्याणासाठी कायम झटत असतात.

मला एकदा उगले आडनावाचे एक शिक्षक भेटले. नावाप्रमाणेच ते विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाचा सूर्य उगवतात हे पेपरला त्यांच्या मेरिटमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांच्या नावावरून कळले.

नगारे आडनावाचे एक बँडवाले भेटले. नावातच वाद्य आहे, कामातही !

मोघे नावापेक्षा वेगळं. मोघे आडनाव ऐकल्यावर वाटलं, मोघम बोलणारे असतील. पण प्रत्यक्षात भेटल्यावर कळलं अतिशय अभ्यासू, स्पष्टवक्ते आणि मधुर वाणी असलेले प्रसिद्ध, लोकप्रिय गृहस्थ आहेत.

प्राण्यांवरून, पक्ष्यावरून, भाज्यांवरून, नक्षत्रांवरून, फुलांवरून पडलेली असावीत का ? अशी आडनावे बघू यात.

वाघ, कोल्हे, लांडगे, डुकरे, गाढवे, ससे, मोर, हरणे, अशी प्राण्यांची नावे असलेली आडनावे तर खूपच आहेत.

चिमणे, कावळे, चिमणी

अशीही काही आडनावाची मंडळी आयुष्यात भेटली.

अंबेजोगाईला असताना माझ्या बहिणीच्या शेजारी चिमणी कुटुंब राहायचं. नाव ऐकून गंमत वाटली, पण घर कायम आनंदी. मुलं-बाळं, नातवंडं यांच्यामुळे घरात सतत चिवचिवाट असायचा.

तसंच भाज्या म्हणाल तर दोडके, गवारे, भेंडे, गाजरे, वांगे, कार्ले, भोपळे, कोथिंबीरे, कांदे, लसणकर, मिरचीकर, आलेकर अशी नावे असलेली आडनावेही माझ्या ऐकण्यात आली.

लसणकर यांच्या घरचा स्वयंपाक झणझणीत असणार. कधी जेवायला बोलावले ?तर नक्की कळेल.

रोहिणकर, चित्रे, पुनवसकर, अश्विनीकुमार, कृत्तिके अशी नक्षत्रांवरून पडली आडनावे असावीत.

शेवंतेकर, चाफेकर, मोगरेकर अशी फुलांवरून पडलेली नावे तर किती सुगंधी! नाही का? यांमागच्या कथा मात्र अजून उलगडायच्या आहेत.

माणूसमारे ते विश्वास.




माणूसमारे हे एक नवीन आडनाव कळलं. विशेष म्हणजे, ती व्यक्ती समाजकार्य करणारी आणि व्यवसायाने डॉक्टर आहे, आणि नंतर माझे मित्रही झाले.

नाव एक आणि काम अगदी विरुद्ध हा विरोधाभासच गंमतीशीर. मी त्यांना आडनाव बदलून घेण्याचा सल्ला दिला. मग त्यांनी विश्वास हे आडनाव धारण केले. आता त्यांच्याकडे येणारे रुग्ण अतिशय विश्वासाने येतात, हे वेगळं सांगायला नको. आणि इतकी गर्दी होते की तेथे एक महिना आधी फोन करून नंबर लावावा लागतो.

संजय व्यापारी नावातच गंमत.

लेखनामुळे मला अनेक पत्रकार मित्र जोडले गेले. त्यातले एक संजय व्यापारी.

माझं पापा नावाचं पहिलं पुस्तक त्यांनीच प्रकाशित केलं. नाव व्यापारी, पण स्वभाव अगदी निराळा. ई-दैनिक अगदी काटकसरीत चालवतात. व्यापाऱ्या सारखं हिशोबी

राहायला आवडत नाही त्यांना .

ते कायम उत्साही, आनंदी असतात. आता पेपर कसा चालवतात? हे त्यांनाच माहित.

आणि मी वसेकर.

माझं मूळ आडनाव देशपांडे. पण वसा या गावावरून वसेकर झालं. कधी बायकोशी वाद झाला की ती चिडवते, ''आडनावाप्रमाणे नुसती वसवस करत असता.''

आता तिचंही आडनाव तेच झाल्यामुळे वयाप्रमाणे फक्त भूमिका बदलल्या आहेत. मी आता बरेचदा नसलो तरी मुका राहतो कारण कामवाली मावशी नाही आल्या की ती माझ्यावरच वसवस करते. कालाय तस्मै नमः म्हणून मी कामवाला होऊन तिला शांत करतो. उगीच घरात वादळ नको. नाही का?

खालील आडनावे असती तर?

सुखदुःखे, हसरे, रडे, वेडे, बोलके, मुके, ओले, सुके, उजेडकर, काळोखे, थंडे, गरमे, शांतकर, गडबडकर, जागृतकर, झोपेकर, रंगीतकर, बेरंगी.


अशी आडनावे मी तरी ऐकली नाहीत. पण असती तर त्या लोकांचं जगणं कसं असतं?

थंडे माणूस रागातही शांत असता का? उजेडकर यांच्या घरी लाईट कधीच गेली नसती का?

रंगीतकर यांचं आयुष्य नेहमीच रंगीबेरंगी असतं का? याची कल्पना करून पाहा. तुम्हाला काय वाटतं? आणि

मलाही नक्की कळवा हे आडनाव पुराण कसं वाटलं?

टीप : या लेखात आलेली आडनावे माझ्या ओळखीची, मैत्रीची आहेत. याच आडनावांची अनेक मंडळी असू शकते. हा लेख केवळ आडनावांची निरागस गंमत म्हणून लिहिला आहे. सर्वांनी तो हसत-हसत वाचावा, हीच अपेक्षा. कुणीही लेखकावर राग मानू नये, ही विनंती.




# पुण्याहून जर्मनीकडे (भाग पहिला)

ज्योतिर्मय साहित्य

आज आम्ही सगळे आतुरतेने वाट पाहत होतो कुरिअरची. ३० एप्रिल २०२६ चा दिवस. आमचा व्हिसा येणार होता. आम्ही यावेळी युरोप ट्रिपला निघालो होतो. विमानाची तिकिटे, हॉटेल बुकिंग, सगळे झाले होते. पण व्हिसा आल्याशिवाय या ट्रिपचे काही खरे नव्हते.

मागच्या बऱ्याच दिवसांपासून पाठपुरावा चालू होता. यावेळी जरा जास्तच उशीर झाला होता व्हिसा मिळायला. संध्याकाळी ७ वाजता पुण्याहून मुंबई एअरपोर्टला निघायचे होते. दुपारचे ४ वाजले तरी अजून व्हिसा आला नव्हता. घरात एक प्रकारची अस्वस्थ शांतता पसरली होती. कुणी घड्याळाकडे बघत होते, कुणी फोनकडे. शेवटी ५ वाजता दारावर कुरिअरवाल्याची बेल वाजली, आणि व्हिसा हातात पडताच सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. तर एकदाचे आम्ही युरोप ट्रिपला निघालो.




रात्री १२ च्या आसपास मुंबई एअरपोर्टवर पोहोचलो. चेक इन करून एकदाचे आम्ही एअरपोर्टवर निवांत गप्पा मारत बसलो. आमच्या समोरच, काही अंतरावर एक जोडपे बसले होते. तेही ट्रिपसाठी खूप उत्साहात दिसत होते. बसल्याबरोबर त्या मुलीने पर्समधून नेलपेंट काढली. घाईगडबडीत घरी लावायची राहून गेली असावी. पण एअरपोर्टवर बसून नेलपेंट लावणार, हे पाहून मला जरा कुतूहल वाटले. आणि पुढे तर अजूनच आश्चर्य वाढले. त्या मुलाने ती नेलपेंट स्वतःच्या हातात घेतली आणि तिच्या दोन्ही हातांच्या नखांना अगदी हळुवारपणे लावून दिली. किती प्रेमाने चालले होते ते सारे, आणि तेही गजबजलेल्या एअरपोर्टवर! ते पाहून मला खूप छान वाटले, मनाला एक वेगळेच समाधान लाभले. या दोघांचे प्रेम असेच कायम राहू दे. हा क्षण माझ्यासाठी मनात कायमचा जपून ठेवण्यासारखा होता.

मुंबईहून आम्ही जर्मनीला निघालो. तिथे म्युनिकमध्ये ३ दिवस राहून नंतर ऑस्ट्रिया या देशाला जाणार, असा प्लॅन होता.

विमान ढगांच्या वर शिरले आणि खिडकीतून खाली मुंबईचे दिवे एखाद्या विखुरलेल्या सोनेरी जाळ्यासारखे दिसू लागले. काही क्षणांतच तेही नाहीसे झाले आणि उरली फक्त अंधाराची अथांग चादर. मनात मात्र उत्सुकतेचे असंख्य दिवे लखलखत होते. आठ तासांचा प्रवास, मधे एक थांबा, आणि मग युरोप.

# ‘‘रामायण! महत्व आणि व्यक्तिविशेष’’

ज्योतिर्मय साहित्य

रामायणाच्या आजवर हजारो आवृत्त्या आणि शेकडो भाष्ये उपलब्ध असताना, ‘‘यात आणखी नवीन काय असणार?‘‘ या शंकेला पूर्णविराम देणारे हे एक अत्यंत आगळेवेगळे आणि समकालीन काळाला दिशा देणारे पुस्तक आहे. लेखक श्री. विश्वास देशपांडे सरांनी कोणत्याही पारंपरिक पठडीत न अडकता, आधुनिक पिढीच्या मानसिकतेचा विचार करून या ग्रंथाची केलेली मांडणी खरोखरच कौतुकास्पद आहे.

आजच्या रील्स आणि वरवरच्या वाचनाच्या युगात, मूळ संहिता न वाचता खलनायकांचे होणारे उदात्तीकरण (उदा. रावणाचे उद्दात्तीकरण) आणि त्यातून निर्माण होणारे गैरसमज दूर करण्यासाठी हे पुस्तक एका दीपस्तंभासारखे काम करते.

१. मानवी मूल्यांचा मेरुमणी : पुरुषोत्तम राम

लेखकाने रामाचे चित्रण करताना त्याला देव्हाऱ्यात कोंडून न ठेवता, एक सर्वगुणसंपन्न माणूस म्हणून आपल्यासमोर उभे केले आहे. एक सामान्य माणूस आपल्या आचरणाने, कर्तव्याने आणि नैतिकतेने कशा प्रकारे देवत्वाच्या उंचीवर पोहोचू शकतो, याचे सुरेख विश्लेषण पुस्तकातील तीन भागांमध्ये आले आहे. पुत्र, पती, बंधू, राजा, योद्धा आणि अगदी शत्रू म्हणूनही रामाचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व वाचकाला अंतर्मुख करते. राम आणि रावण यांच्यातील संघर्ष हा केवळ दोन व्यक्तींमधील नसून, तो ‘‘विश्वात्मक विचार विरुद्ध टोकाचा




व्यक्तिवाद‘‘ आणि ‘‘संस्कारित रामवृत्ती विरुद्ध नैसर्गिक रावणवृत्ती‘‘ यांमधील फरक स्पष्ट करणारा आहे.

२. स्त्रीत्वाचा स्वाभिमान आणि इतर व्यक्तिरेखा

‘‘जेथे राघव तेथे सीता‘‘ या उक्तीप्रमाणे सीतेच्या अलौकिक आणि स्वतंत्र अस्तित्वाचे दर्शन यात घडते. सीतेवरील कथित अन्यायाचा आणि तिच्या अग्निपरीक्षेचा संवेदनशील प्रसंग लेखकाने अत्यंत निष्पक्ष आणि संयतपणे हाताळला आहे. आजच्या झटपट लग्न आणि झटपट काडीमोड या अस्थिर काळात राम-सीतेचे नाते एक आदर्श वस्तुपाठ ठरते.

याशिवाय लक्ष्मण, भरत, उर्मिला, मंदोदरी आणि बिभीषण यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे अचूक आकलन लेखकाने मांडले आहे. त्यातही संकटमोचक आणि परमभक्त हनुमंतावरील दोन प्रकरणे लेखकाच्या आत्मीयतेमुळे प्रचंड वाचनीय झाली आहेत. अगदी नकारात्मक मानल्या गेलेल्या कैकयीच्या मनाचे विश्लेषणात्मक चित्रण करून तिच्याविषयीचे गैरसमज दूर करण्याचा स्तुत्य प्रयत्न यात दिसतो.

३. प्राचीन व्यवस्था आणि आजची परिस्थिती

एक शिक्षक म्हणून देशपांडे सरांनी रामायणकालीन राजसत्ता आणि गुरुसत्ता (शिक्षण पद्धती) यांच्यातील सुवर्णसमन्वयावर अचूक बोट ठेवले आहे. आजच्या व्यावसायिक आणि भ्रष्ट शिक्षण व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारी ती जीवनपद्धती किती श्रेष्ठ होती, हे प्रकर्षाने जाणवते. अष्टप्रधान मंडळ, ऋषिमंडळ आणि राजा यांच्या त्रिसूत्रीवर चालणारी रामराज्याची न्यायप्रिय शासन व्यवस्था आणि आदर्श कुटुंबसंस्था आजच्या विस्कळीत समाजाला आरसा दाखवणारी आहे. लक्ष्मणरेषेचे सामाजिक महत्त्व, वालीवध यांसारख्या वादग्रस्त मुद्द्यांवर लेखकाने अत्यंत परिपक्वतेने भाष्य केले आहे.




४. सांगीतिक गोडवा आणि रसाळ भाषा

पुस्तकाचा शेवट म्हणजे सुग्रास जेवणानंतरचा गोडाचा घास आहे! गीतरामायणाव्यतिरिक्त असणारी, रामाच्या बालपणापासून राज्याभिषेकापर्यंतची वेगळी रामगाणी समाविष्ट करून लेखकाने आपल्यातील गहिऱ्या संगीततज्ज्ञाची ओळख करून दिली आहे. पुस्तकाची भाषा अत्यंत साधी, सरळ आणि प्रवाही असल्याने ते कुठेही क्लिष्ट वाटत नाही.

हे पुस्तक केवळ एका विशिष्ट धर्मापुरते मर्यादित नसून मानवी मूल्यांचा आदर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी संग्रहणीय आहे. लेखकाची रामावरील प्रगाढ आणि डोळस श्रद्धा या पुस्तकाच्या पानापानातून पाझरते. आजच्या तरुण पिढीने आणि पालकांनी हे पुस्तक केवळ वाचावे असे नाही, तर त्यावर मनन करून ते आचरणात आणण्याची गरज आहे. अक्षरांच्या माध्यमातून प्रभू श्रीरामाच्या चरणी अर्पण केलेली ही एक नितांत सुंदर आणि चैतन्यमय भावांजली आहे. प्रत्येकाने आवर्जून अनुभवावा असा हा एक ‘‘नवनवोन्मेषशालिनी वाङ्मयीन उत्सव‘‘ आहे!

ग्रंथवेध: ‘‘रामायण! महत्व आणि व्यक्तिविशेष‘‘

एका डोळस रामभक्तीचा रसाळ प्रवास

लेखक – श्री. विश्वास देशपांडे ९४०३७४९९३२

प्रकाशक – सोहम क्रिएशन अँड पब्लिकेशन

# ‘मड डे’ एन्जॉय करू चला....

ज्योतिर्मय साहित्य

दररोज शाळेतून घरी आल्या आल्या कधी एकदा आज काय काय झाले, टीचर काय म्हणाल्या, फ्रेंड्स सोबत काय काय मज्जा केली, काय नवीन शिकवलं, हे सगळे आज्जी,आबांशी शेअर करतो असे झालेले असते. आई,बाबांना पण सगळे सांगायचे असते,पण ते दोघेही कंपनीत असतात, त्यामुळे आधी सगळे आज्जी,आबांच्या सोबत शेअर करायचे असते. आई,बाबा आल्यानंतर पून्हा ती रेकॉर्ड असतेच. आज तिने आज्जीला सांगितले,उद्या किनई आज्जी, आमच्या स्कुल मध्ये मड डे सेलिब्रेट करणार आहेत.दरवर्षी २९ जुन ला सगळ्या जगात सेलिब्रेट करतात म्हणे हा दिवस! त्यामुळे नो युनिफॉर्म! कोणताही ड्रेस घालून येण्यास सांगितले आहे. रेवा म्हणत होती,मड डे

**सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.**

म्हणजे खूप मोठा मातीचा ढीग असतो, त्यात पाणी घालून चिखल बनवतात, त्याने खेळायचे असते. खरय् का ग? तसे असेल तर मी उद्या मुळीच जाणार नाही बरका स्कुल मध्ये. शी,किती घाण असतो चिखल..यौक.. आज्जी,पिग, बॅफेलोज असे प्राणी बसतात ना त्यात? मला तर नाही बाबा आवडत. आज्जीला तिची नक्कल पाहून हसूच आले. नाही जाणार स्कुल मध्ये उद्या! आज्जी तेंव्हा काहीच बोलली नाही. तिने आबाना

ही गोष्ट हळूच सांगितली. तिचे जेवण झाल्यावर तिची झोप झाल्यावर सांगू म्हणत त्यांनी काहीतरी ठरवले.

झोपून उठल्यावर दूध पिणे होते तोच तिचे फ्रेंडस आले तिच्या सोबत खेळायला. त्यांना बंगल्यातील गार्डनमध्ये खेळायला खूप आवडायचे. आज ते आले तेंव्हा आबांची झाडे लावण्याची सगळी तयारी पहिली होती. आतावयोमानामुळे,पायामुळे त्यानाखाली बसणे शक्य नव्हते म्हणून ते एका छोट्या स्टूलवर बसले आणि जमीन उकरून छोटे आळे तयार करून त्यात माती घालून एकेक रोप लावत होते. आळ्याच्या भोंवती लाल विटां तिरक्या तिरक्या लावत होते,म्हणजे त्यात पाणी



साठवले जाईल. त्या इतक्या सुंदर दिसत होत्या? हे सगळे छोटी सिया आणि बालचमु लांबुनच अगदी कुतूहलाने पहात होती. आबांनी सियाला जवळ बोलावले, तेंव्हा ती म्हणाली ,माझ्या छान फ्रॉकला मातीचे घाणेरडे डाग पडतील ना!शी बाई,मला त्या घाणेरड्या चिखलात नाही आवडत,आणि आई पण रागावेल, ड्रेस घाण झालाम्हणून..सगळे मित्र मात्र आता हळुहळु आबांच्या भोवती येऊ लागले.

आबा गालातल्या गालात हसले,ते म्हणाले

आई नाही रागावणार,तु ती ॲड पाहतेस ना टिव्हीवर, जिद्दी डागसुद्धा किती सहज गायब होतात ते! मग कशाला काळजी करायची? पण आबा,मला घाण वाटते ना या मातीत, चिखलात हात घालायची!

अस्सं होय? मग आता ऐक..

तु तहान लागल्यावर आता जे मस्त थंडगार पाणी आवडीने पितेस,तो डेरा,माठ,रांजण मातीचेच असतात, आपल्याला अन्न मिळते,ते सुद्धा पिकते ते या मातीतच! फळे,फुले,अन्नधान्य, इतकेच काय, आपण अंगावर घालतो,ते सूती कपडे सुद्धा आपल्याला या मातीत पिकलेल्या कापसापासूनच मिळतात आणि राहण्यासाठी जे घर बांधतो , त्यातील दारे, खिडक्या, खेडे गावातील घराचे छप्पर, झोपड्या वगैरे आणि फर्नीचर हे सारे मातीतील वृक्षांच्या लाकडापासुनच बनते. पक्षी घरटी बांधून त्यात राहतात ती या मातीत घट्ट मुळे रोवलेल्या वृक्षावरच. मातीच ही मुळे घट्ट धरून ठेवते. **(क्रमशः)**


# अधिक मासामध्ये पुस्तकाचे वाण

ज्योतिर्मय साहित्य

साताऱ्यातील ज्येष्ठ पत्रकार आणि सकाळ, दै.ऐक्य व इतर वृत्तपत्रांचे माजी संपादक आणि आमच्या आम्ही पुस्तकप्रेमी सातारा समुहाचे संयोजनातील एक प्रमुख मुकुंद फडके यांनी अधिक मासानिमीत्त वाचनप्रेमींसाठी पुस्तकांचे वाण देण्याचा अभिनव उपक्रम राबविला. मुकुंद फडके यांनी आपल्या संग्रहातील पुस्तके वाचकांसाठी भेट देण्यासाठी खुली केली. कोणीही वाचनप्रेमी त्याच्या आवडीचे पुस्तक त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पुस्तकाच्या लायब्ररीमधून घेऊन जाऊ शकेल असे त्यांनी वृत्तपत्रांमधून तसेच आम्ही पुस्तक प्रेमी समूहाच्या ग्रुपवर तसेच इतर ग्रुपवर जाहीर केले होते. सध्याच्या कोणी कोणाच्या घरी जाण्याचे प्रमाण कमी झाल्याच्या काळात पुस्तके मोफत मिळणार यामुळे मुकुंद्र फडके यांच्याघरी मित्रपरिवार तसेच बातम्या वाचून येणाऱ्या वाचकांनी याचा लाभ घेतला. अधिक मास १७ मे ते १५ जुन आणि वाचन सप्ताह १८ जुन ते २५ जुन म्हणजेच सलग जवळपास ४० दिवस ही योजना मुकुंद फडके यांच्या घरी चालू होती. मुकुंद फडके एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी वेळोवेळी त्यांच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या पुस्तकांच्या याद्याही विविध ग्रुपवर प्रसिद्ध केल्या. २६ मे २०२६ रोजी पुस्तकांची एक यादी जी त्यांनी आम्ही पुस्तकप्रेमी समूहावर प्रसिद्ध केली त्यामध्ये ह.भ.प. सोनोपत दांडेकर यांची प्रवचने संकलन/संपादन डॉ. सुरेश गरसोळे- मुक्ता गरसोळे कुलकर्णी हे पुस्तक माझ्या वाचनात आल्याबरोबर मुकुंद फडके यांना हे पुस्तक मला हवेय तरी कृपया बाजूला ठेवावे असे त्यांना कळविले. सुरेश गरसोळे हे माझे ज्येष्ठ मित्र. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणूकीच्या निमित्ताने त्यांची माझी मैत्रीचे ऋणानुबंध निर्माण झाले आहेत. सुरेश गरसोळे हे अष्टपैलू व्यक्तिमत्व विविध स्तरावर कार्यरत आहेत. कथाकथन, लेखक, भूगोलाचे तज्ञ, प्रवचनकार, नट अशा वेगवेगळ्या स्तरावर त्यांचे कार्य चालू आहे.

भूगोलामधील नकाशा या विषयावर त्यांनी केलेले कार्य भूषणावह आहे. नकाशा हा भूगोलापुरता मर्यादित नसून तो अनेक विषयांना स्पष्टीकरणार्थ माहिती देण्यासाठी, प्रबोधनासाठी आणि नियोजनासाठी उपयोगी पडतो. यादृष्टीकोनातून भूगोलाचा अभ्यासक या नात्याने सुरेश गरसोळे यांना नकाशे समाजाभिमुख करण्याची आवड आणि संधी प्राप्त झाली. त्यातून गेली ५० वर्षे नकाशा मांडणीतले आणि प्रकाशनातले विविध प्रयोग आणि उपयोग वेगवेगळ्या माध्यमातून म्हणजे वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके, आकाशवाणी, दूरदर्शन यातुन मांडण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी सहकाऱ्यांच्या सक्रिय कृतीने सिद्ध केला.हा एक सुरेश गरसोळे यांच्या आयुष्यातील शिक्षणयोगच म्हंटला पाहिजे. मुळातच भूगोल व नकाशे हा विषय तसा दुर्लक्षित आणि कमी महत्वाचा सकृत दर्शनी वाटतो पण तो तसा नाही हे विश्वकोशाचे प्रमुख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दूरदर्शीपणे १९७० च्या दशकात ओळखले आणि त्यांनी भारतकेंद्रस्थानी मानून मराठी वाचकांच्या उपयोगाचे नकाशे करण्यासाठी सुरेश गरसोळे यांना प्रेरीत केले. तसेच प्राधान्य अशा नकाशांना विश्वकोशात दिले. अगदी अलीकडे म्हणजे १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पुण्यातील पटवर्धन बागेतील मुखर्जी उद्यानात सहा फूट बाय सहा फूट महाराष्ट्राचा महा नकाशा व सहा फूट बाय सहा फूट महाराष्ट्राचा पर्यटन नकाशा रंगीत सचीत प्रदर्शित सुरेश गरसोळे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. याचा उपयोग विद्यार्थी, पालक, नागरीक या सर्वांना होतो आहे. यामध्ये पर्यटनाची ठिकाणे, छायाचित्रे व अंतर दाखविली आहेत.




तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांचा विशेष लोभ सुरेश गरसोळे यांच्यावर होता. पुणे याज्ञवल्क्य आश्रम कसबा पेठ या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाच्या कार्यक्रमासाठी १९८० च्या दशकात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री हे सुरेश गरसोळे यांच्या आग्रहास्तव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी याज्ञवल्क्य ऋषीच्या मौलिक ज्ञानाचे दर्शन आपल्या प्रकांड पांडित्य व्याख्यानातून व्यक्त केले. ते भाषण अनमोल ठेवा म्हणून गरसोळे यांच्या संग्रही आहे. गोंदवलेकर महाराजांची प्रवचने ३६५ दिवसांसाठी प्रत्येक दिवसाला एक याप्रमाणे भाविकांच्या वाचनासाठी उपलब्ध आहेत. त्यावरून प्रेरणा घेऊन सुरेश गरसोळे आणि त्यांची कन्या मुक्ता गरसोळे-कुळकर्णी यांनी आधुनिक वारकरी संत सोनोपंतांची प्रवचने वारकरी सांप्रदायिकांना ह.भ.प. सोनोपंत दांडेकर यांची प्रवचने या पुस्तकात उपलब्ध करून दिली आहेत. या पुस्तकाला उत्तम प्रतिसाद वारकरी संप्रदायांकडून आणि कीर्तन प्रवचनकारांकडून लाभला आहे. सोनोपंत दांडेकर यांच्या ध्वनिमुद्रीत आणि लिखित साहित्यावरून हे पुस्तक संकलित आणि संपादित करण्यात आले आहे. ९ जुलै ही सोनोपंत दांडेकर यांची पुण्यतिथी ‘वैकुंठवासी ह.भ.प. प्राचार्य सोनोपंत दांडेकर संतवांड:मय प्रसारक मंडळ’ पुणे यांचे तर्फे पन्नास वर्षाहून अधिक काळ पुण्यात साजरी केली जाते. हे पुस्तक माझ्या संग्रही मुकुंद फडके यांच्या अधिक मासातील पुस्तके वाण देण्याच्या संकल्पनेमुळे मला मिळाले हा आनंद अवर्णनीय आहे.

मुकुंद फडके यांनी साधारणपणे सातशेच्यावर पुस्तकांचे वाटप अधिक मास व वाचन सप्ताहात केले आहे. त्यांनी तीन ते चार दुर्मिळ पुस्तकांच्या याद्या प्रसिद्ध करून वाचकांना दुर्मिळ पुस्तकांचा मालकी हक्काने वारसा त्यांनी अधिक मास च्या निमित्ताने दिला आहे. २६ मे, १ जून मराठी पुस्तकांची यादी तसेच ३ जून ला इंग्रजी पुस्तकांची यादी प्रसिद्ध करून अशा वेगवेगळ्या संकल्पना राबवित वाचन संस्कृती वृद्धींगत करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न सर्वांना मार्गदर्शक आहेत. लॉ कॉलेजच्या वकील झालेल्या एका विद्यार्थ्यांने अनेक इंग्रजी पुस्तके नेली. जेन्टस पार्लर चालविणाऱ्या सचिन खरे यांनी पार्लरमधील वाचनालयासाठी ४५ पुस्तके नेली. याव्यतिरिक्त काही छोट्या छोट्या ग्रंथालयांना आणि वाचनालयांना प्रत्येकी तेहतीस पुस्तके देण्याचाही उपक्रम त्यांनी राबविला. कथा, कादंबऱ्या, ललित वाङ्मय, कवितासंग्रह, चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक साहित्य, शैक्षणिक, वैज्ञानिक अशी विविध प्रकारची पुस्तके या उपक्रमाव्दारे मुकुंद फडके यांनी उपलब्ध करून दिली. इंग्रजी भाषेवर आणि साहित्यावर प्रभुत्व असणाऱ्या मुकुंद फडके यांनी त्यांच्या संग्रहामधील शेकडो इंग्रजी पुस्तके विशेषतः तरूण वाचकांना अधिक मास महिन्यात वाण स्वरूपात दिली आहेत.

मी पुण्यामध्ये उत्कर्ष प्रकाशन याठिकाणी सु.वा. जोशी या प्रकाशकांकडे जो साहित्यिकांचा अड्डा आहे त्याठिकाणी पुण्यात असताना जातो. ज्यांनी फुटपाथवर जुनी पुस्तके विकत आपल्या स्वकर्तृत्वावर प्रगती करीत प्रकाशन क्षेत्रात नाव कमाविले आहे त्या सु वा जोशी यांच्या उत्कर्ष बुक डेपो मध्ये जुनी पुस्तके विक्रीसाठी येतात. यामध्ये विशेषतः लेखक, कवी आणि संग्राहक वाचक यांच्या नव्या पिढीतील मंडळी त्यांची जुनी पुस्तके रद्दीच्या भावात आणून देतात. मुकुंद फडके यांच्यासारखा संपादक, पत्रकार, लेखक, वाचक ज्यापद्धतीने आगळीवेगळी संकल्पना राबवित अधिक मासामध्ये पुस्तकाचे वाण वाचन संस्कृती वाढविण्यासाठी देत आहेत त्याचप्रकारे आपणही योग्यवेळी आपल्याकडे असणारा ग्रंथांचा साठा योग्य हाती जाण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाने प्रयल करूया.